श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

दि. २७.०३.२०२५

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

विषय :— शासन मान्यता असलेल्या नोंदणीकृत सराफांची सोने, चांदी व खडेजडीत अलंकाराचे मुल्यांकन करण्याकरीता इच्छूक सराफांकडून सिलबंद दरपत्रके मागविण्याबाबत

भाविकांकडून श्रींस अर्पण करण्यात येणाऱ्या सोने, चांदी व खडे यांचे मुल्यांकन करण्यासाठी शासन मान्यता सराफांकडून सन २०२५— २०२६, २०२६—२०२७ व २०२७—२०२८ या तीन वर्षाकरीता तीन सराफांचे पॅनल बनवून त्यातील दरवर्षी एका सराफाची निवड करण्यासाठी नामांकित सराफांकडून सिलबंद दरपत्रके_मागविण्याचे प्रस्तावित आहे.

दरपत्रक मागविण्याबाबतची संपूर्ण माहिती अटी व शर्ती www.siddhivinayak.org या सांकेतिक स्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| दरपत्रके प्रसिध्दीचा दिनांक | : गुरूवार, दि. २७ मार्च २०२५ |
| दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | : बुधवार, दि. ०२ एप्रिल २०२५, दु. १२ पर्यंत |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ | : बुधवार, दि. ०२ एप्रिल २०२५, दु. ०३ वा. |

अटी व शर्ती :—

१. मुल्यांकन करणारे सराफ हे शासन मान्यता असलेले नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

२. मुल्यांकन सराफांना मुल्याकंनाचा कमीत कमी दहा वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३. मुल्यांकन सराफांस सोने व चांदीच्या कसाची, खडयांची तसेच दररोजच्या बाजारभावाची योग्य माहिती असणे आवश्यक आहे.

४. मुल्यांकनाकरिता लागणारे साहित्य सराफांनी स्वत: आणणे व उपलब्ध करणे आवश्यक असेल.

५. हुंडीतील जमा होणाऱ्या तसेच दररोज अभिषेक कक्षात जमा होणाऱ्या सोने व चांदीच्या वस्तुंचे मुल्यांकन दर आठवडयाच्या बुधवारी करण्यात येईल त्यावेळी मूल्यांकन प्रतिनिधी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

६. मुल्यांकन सराफांना आर्थिक वर्षाच्या अखेरीस (३१ मार्च नंतर) त्या आर्थिक वर्षाचा तपशीलवार हिशोब मुल्यांकनासह चार प्रतीमध्ये न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.

७. सराफांनी स्वत: अथवा त्यांचेकडील सोने, चांदी व खडयांची पारख असलेल्या अनुभवी व जाणकार प्रतिनिधीस पाठविणे आवश्यक असेल.

८. मुल्यांकनासाठी पाठविण्यात येणारे प्रतिनिधी प्रामाणिक व उत्तम चारित्र्याचे असणे आवश्यक असेल. तसेच मुल्यांकन करण्याकरिता सोबत दुकानाचे ओळखपत्र आणणे आवश्यक आहे.

९. मुल्यांकन करणाऱ्या सराफांची शाखा मुंबईस्थित असणे आवश्यक आहे. जेणेकरून तात्काळ गरज भासल्यास मंदिरात उपस्थित राहता येईल.

१०. न्यासाला कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार असेल.

**तांत्रिक दरपत्रकाचा तपशील** सादर करताना खालील बाबी सादर करणे आवश्यक आहे.

अ) शासन मान्याता ( Govt. Approved )नोंदणीकृत प्रमाणपत्राची प्रत

ब) पॅन क्रमांक प्रत

क) GST क्रमांक प्रत

ड) मागील ३ वर्षाची आर्थिक उलाढाल सरासरी १० कोटी असावी. याबाबत सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

इ) मुल्यांकनाचे काम केल्याबाबतचा १० वर्षाचा अनुभव असल्याबाबतची प्रमाणपत्रे सादर करावीत.

उक्त नमूद अटींची पूर्तता करणाऱ्या सराफांकडून न्यूनतम दर सादर केलेल्या तीन सराफांची निवड करून त्यांचे पॅनल तयार करण्यात येईल.

११.तीन वर्षासाठी चक्रीय पध्दतीने निवड करावयाची असल्यामुळे आलेल्या अर्जामधून तीन सराफांची निवड केली जाणार आहे. त्यांचे पॅनल म्हणून निवड करून त्यांच्यामधूनच तीन वर्षासाठी एका एका सराफाकडे न्यासाचे दागिण्यांचे मुल्यांकनाचे काम देण्यात येईल.

१२.दागिन्यांचे मुल्यांकन करतांना दागिन्यांचे नुकसान व मोडतोड होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक असेल. काळेमणी, नकली मणी / मोती व खडे ज्यांना बाजारी मुल्य नाही ते काढून दागिन्यांचे वजन व मुल्यांकन करून दयावे लागेल.

१३.श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिराचे सर्व कामकाज हे मराठी मातृभाषेत असल्यामुळे मुल्यांकन करण्यासाठी येणाऱ्या सराफांना अलंकारांची नोंदणी पुस्तकात नोंदणी करण्यासाठी मराठी भाषेत लिहिता व वाचता येणे आवश्यक आहे.

१४. न्यासाच्या दागिन्यांच्या लेखांकनाचे व हिशोबाचे कामकाज आपल्यामुळे खोळंबणार नाही याची दक्षता आपल्याला घ्यावी लागेल.

१५. दरपत्रक सादर करतांना **तांत्रिक व मूल्य दरपत्रक तपशील** इच्छूक सराफांनी याप्रमाणे **दोन वेगवेगळया लखोटयामध्ये** भरून दरपत्रकधारकाने A4 आकाराच्या लखोटयामध्ये लाखेने सिलबंद करून सादर करणे बंधनकारक आहे. या दोन्ही लखोटयावर ठळक अक्षरात मुल्यांकन सराफांचे पॅनल म्हणून नियुक्तीचा देकार असे स्पष्टपणे नमूद करावे.

१६.अधिक माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दुरध्वनी क्र. ०२२–६२४९१११०/११४ वर सोने–चांदीचे विभागप्रमुख यांच्याशी संपर्क साधावा.

( वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# मूळदरपत्रक

## दरपत्रकामध्ये खालील बाबी अंतर्भूत करण्यात याव्यात

**निविदाधारकाचे नाव :** ____________________

**निविदाधारकाचा कायमचा पत्ता :** ____________________

____________________

**शासन मान्यता प्रमाणपत्र नोंदणी क्रं :** ____________________

**जी.एस.टी. क्रं :** ____________________

| अनु. क्र. | तपशील | वार्षिक रक्कम (सर्व करांसहित) |
|---|---|---|
| १ | सोने – चांदी व खडेजडीत वस्तुंचे मुल्यांकन करण्याच्या कामाचे वार्षिक मानधन (सर्व करांसहित) | |

दरपत्रक धारकाची सही व शिक्का